# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप /केंस क्र.५१/२०१६-१७/१५०        दिनांक : १८-०४-२०१७

**<u>आदेश केस क्र.५१ /१६-१७</u>**

| | |
|---|---|
| श्री प्रकाश बाबूराव जाधव,<br>१०/६५६/२२ नटराज चौक, आण्णा रामगोंडा शाळेजवळ<br>इचलकरंजी जि.कोल्हापूर | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर.<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी<br><br>३) उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग ब इचलकरंजी | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-**
१.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) वितरण कंपनीने तक्रारदार यांचे विरुध्द वीजेचा अनधिकृत वापर केल्याचा आरोप करुन विद्युत कायदा कलम २००३ चे कलम १२६ लागू होत नसताना तक्रारदारकडून भरुन घेतलेली रक्कम रु. ४५,४८०/- व्याजासह परत मिळावी वगैरेबाबत प्रस्तुत गा-हाणे अपिल तक्रारदार यांनी दाखल केले आहे.

## तक्रारदार यांचे गा-हाणे

२) तक्रारदार हे घर क्र.१०/६५६ /२२ , नटराज चौक, इचलकरंजी येथे रहात असून त्या ठिकाणी ग्राहक क्र. २५०६४४००९७४९/८ ची घरगुती वीज जोडणी त्यांचे मयत वडील बाबूराव लक्ष्मण जाधव, यांचे नावे असून ती तक्रारदार वापरीत आहेत. सदर घराचे मागिल बाजूस जी खोली जागा आहे तेथे पूर्वी यंत्रमागाचा उद्योग होता(ग्राहक क्र. २५०३८००२२६१०) तो बराच काळ बंद अवस्थेत आहे. या मागिल जागेत कोणतेही उत्पादन घेतले जात नाही अगर व्यापार केला जात नाही. त्या जागेत जुना खराब माल पडलेला आहे. पुढील घरातून सदरच्या मागिल जागेत केवळ एक बल्ब वायर जोडून प्रकाशासाठी बसवला आहे. असे असता दिनांक २२.०६.२०१६ रोजी वि.प. यांच्या सहाय्यक अभियंता यांनी सदरच्या मागिल बाजूच्या जागेची तपासणी करुन, घरगुती वीज जोडणी वरुन व्यापारी कारणाकरिता (गोडावूनसाठी) तक्रारदार अनधिकृतरित्या वीज वापर करीत आहेत असा निष्कर्ष काढला आणि तक्रारदार यांनी अनधिकृत वीज वापरापोटी रु. ४५,४८०/- भरावेत, अन्यथा वीज पुरवठा खंडीत करण्यात येईल. अशा नोटीसा दिल्या सदर रक्कम तक्रारदार यांनी आक्षेप व्यक्त करुन दि २०-१०-२०१६ रोजी भरणा केली आणि त्याच दिवशी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे गा-हाणे दाखल केले. तक्रारदार यांचे म्हणणे असे की, विद्युत कायदा कलम १२६ खाली कारवाई करण्यासाठी निर्देशित केलेली कार्य पध्दतीचे पालन केलेले नाही. सदर कलम १२६ लागू पडत नाही. वादग्रस्त जागेत व्यापारी कारणाचा वापर होत होता असे जरी क्षणभर मानले तरीही तक्रारदार यांचा दरमहा वापर ३०० युनिटपेक्षा कमी असल्यामुळे मा. विद्युत नियामक आयोगाच्या निर्देशानुसार आणि वि.प. यांची परिपत्रके क्र.२०७ व २४३ प्रमाणे अनाधिकृत वीज वापर होऊ शकत नाही. अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने तक्रारदार यांचे गा-हाणे दिनांक ३०-११-२०१६ रोजी अमान्य केल्यामुळे त्यांनी सदर अपिल या मंचासमोर दिनांक १९-०१-२०१७ रोजी दाखल केले आहे. (तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे त्यांच्या तोंडी विनंती वरुन सुनावणीस उशीर झाल्याने या अपिलाचा निर्णय करण्यास विलंब झाला.)

## वितरण कंपनीची भूमिका

३) वि.प. यांचेतर्फे दि. ०३-०३-२०१७ चे लेखी निवेदन दि. १०-०३-२०१७ रोज दाखल करणेत आले आहे. बाबूराव लक्ष्मण जाधव यांच्या नावे असलेल्या घरगुती वीज जोडणी ग्राहक क्र. २५०६४४००९७४९ यावरुन तक्रारदार हे दुस-या शेडमधील गोडावूनसाठी वाणिज्य वापराकरिता घरगुती वीज वापरताना दि. २३-०६-२०१६ च्या तपासणीमध्ये आढळून आले. त्यावरुन विद्युत कायदा कलम १२६ प्रमाणे कारवाई सुरु करुन व प्राथमिक चौकशी करुन दोन वर्षाच्या वापराचे रु. ४५,४८०/- चे Provisional Bill देण्यात आले. तक्रारदार

हे कारवाईस विलंब करणेसाठी हेतूतः नोटीसा, पत्रे स्विकारत नव्हते. त्यांनी सुनावणी घेणेच्या कामात विलंब केला व सुनावणीस हजर राहिले नाहीत. जेव्हा कलम १२६ नुसार केलेल्या आकारणीसाठी दि. २०-१०-२०१६ रोजी सदर घरगुती वीज जोडणी तात्पुरती खंडीत करणेत आली तेव्हा तक्रारदार यांनी वरील रक्कम रु. ४५,४८०/- भरणा करुन व पुन्हा जोडणीची रक्कम भरुन वीज पुरवठा पुन्हा चालू करुन घेतला . तक्रारदार यांना पुन्हा अंतिम सुनावणीस बोलावणेत आले व ते दि. ०२-०३-२०१७ रोजी उपस्थित राहिले त्यामध्ये तक्रारदार हे वीजेचा अनधिकृतपणे वापर करीत असल्याचे सविस्तर चौकशीअंती सिध्द झाले आहे. त्यामुळे कलम १२६ प्रमाणे करणेत आलेली कारवाई बरोबर व कायदेशीर आहे. सदर तक्रार या मंचाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

४) या अपिलाची सुनावणी दि . ०६.०४.२०१७रोजी मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे आणि वि.प. तर्फे सहाय्यक अभियंता श्री सुनिल चव्हाण यांचा तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) या प्रकरणात वि.प. तर्फे तक्रारदार यांचे विरुध्द केलेली कथित कारवाई विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ च्या तरतूदीचा कक्षेत येत` काय?
उत्तरः- नाही.

२) वि.प. यांनी वसूल केलेली रक्कम रु. ४५,४८०/- तक्रारदार यांना परत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?
उत्तरः- होय

३) कोणता अंतिम आदेश?
उत्तर :- शेवटी नमूद केल्याप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

६) तक्रारदार - प्रकाश बाबूराव जाधव हे इचलकरंजी येथील घर क्र. १०/६५६/२२ येथे रहात असून तेथे ग्राहक क्र. २५०६४४००९७४९ या क्रमांकाचे घरगुती वीज कनेक्शन कार्यरत आहे. या घराचे मागिल (पूर्व) बाजूस असलेल्या खोलीमध्ये किंवा शेडमध्ये पूर्वी बाबूराव लक्ष्मण जाधव यांचे नावे औद्योगिक वीज जोडणी ग्राहक क्र. २५०३८००२२६१० यंत्र मागासाठी चालू होती. त्या कायम स्वरुपी खंडीत केलेल्या वीज जोडणी वरील थकबाकी वसूलीची कारवाई वि.प. यांनी सुरु केलेनंतर तक्रारदार यांनी केस क्र. ३७(२०१६-१७) या मंचासमोर दाखल केली होती आणि त्या प्रकरणाचा निर्णय या मंचाने दि. २०-०१-२०१७ रोजी करुन तथाकथित थकबाकी वसूलीस अपात्र आहे असा आदेश पारित केला. सदर बाबूराव लक्ष्मण जाधव हे तक्रारदार यांचे मयत वडील आहेत.

७) दिनांक २३-०६-२०१६ रोजी वि.प. यांचे शाखा अभियंता यांनी तक्रारदार यांचे घरामागील वादग्रस्त शेडची तपासणी केली होती. त्यावेळी तक्रारदार यांचे घरातून वायरद्वारे सदर शेडमध्ये एक CFL बल्ब बसवून वीज घेतली होती. केवळ याच एका कारणा वरुन वि.प. यांचे असे म्हणणे आहे की, तक्रारदार हे सदर वादग्रस्त शेडमध्ये (गोडावूनमध्ये) अनधिकृतपणे वाणिज्य कारणासाठी वीज वापर करीत होते. याच कारणा वरुन वि.प. तर्फे कलम १२६ प्रमाणे कारवाई तक्रारदार विरुध्द सुरु करणेत आली.

८) दि. २३-०६-२०१६ रोजी केलेल्या पंचनाम्याची प्रत वि.प. यांनी दाखल केली आहे. हा पंचनामा सायंकाळी ०४.४० ते ०५.०० चे दरम्यान तक्रारदार व दोन पंचाचे समक्ष केला होता. या पंचनाम्यात, सदरच्या वादग्रस्त शेडमध्ये कोणकोणते साहित्य ठेवले होते . याचा अजिबात उल्लेख नाही. तक्रारदार यांचे स्पष्ट म्हणणे आहे की, त्यांनी सदर शेडमध्ये गुंज, सुत, कापड इत्यादि खराब झालेला टाकावू(भंगार) माल ठेवला होता आणि तो व्यवस्थित दिसावा म्हणून तेथे एक CFL बल्ब लावलेला होता. तक्रारदार हे कोणत्या प्रकारे कथित गोडावून मधील साहित्य व्यापार करण्यासाठी वापरीत होते हे स्पष्ट होत नाही. अशा स्थितीत तक्रारदार यांचे म्हणणे की, शेडमध्ये खराब माल ठेवला होता हे स्विकारणे जरुर आहे.

९) जवळजवळ प्रत्येक घरामध्ये नको असलेले, खराब झालेले किंवा वापरात नसलेले असे साहित्य ठेवलेले असते आणि ते वेळप्रसंगी भंगारवाल्यास अल्प दरात विकलेजाते किंवा त्या साहित्याची अन्य प्रकारे विल्हेवाट लावली जाते. याचा अर्थ सदर घरांचा वापर गोडावूनसाठी म्हणजे व्यापारी कारणासाठी केला जातो असे म्हणताच येणार नाही.

१०) वि.प. यांची परिपत्रके क्र.२०७ दि. ०२-०९-२०१३ आणि २४३ दिनांक ०३-०७-२०१५ याकडे आमचे लक्ष वेधण्यात आले. त्यामध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, एखादा घरगुती ग्राहक आपल्या घराच्या काही भागात व्यापार, उद्योग वगैरे करीत असेल आणि त्याचा वीज वापर दरमहा ३०० युनिटस किंवा दरसाल ३६०० युनिटपेक्षा कमी असेल तर वीजेची आकारणी घरगुती दराने करणेत यावी . मा. विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार ही परिपत्रके काढण्यात आली.

११) प्रस्तुत प्रकरणात तक्रारदार यांचा वीज वापर उपरोक्त परिपत्रकात नमूद केलेल्या मर्यादेपक्षा जास्त होता हे दर्शविणारा कोणताही पुरावा नाही. उलट, वि.प. यानी दाखल कलेले दि. २८-०७-२०१६ चे देयक स्पष्टपणे दाखवते की, ऑगस्ट २०१५ ते जून २०१६ च्या कालावधीत तक्रारदार यांचा वीज वापर दरमहा ३०० युनिटपेक्षा बराच कमी होता.

१२) वर परिच्छेद १० मध्ये नमूद केलेल्या परिपत्रकांबद्दल वि.प. तर्फे श्री सुनिल चव्हाण यांनी असे प्रतिपादन केले की, सदर परिपत्रके Ultra Vires (म्हणजे Beyond Power) आहेत. सदरचे प्रतिपादन पूर्णतः अस्विकारार्ह आहे. मा. वीज नियामक आयोग हा विद्युत कायदा २००३ या केंद्र शासनाच्या कायद्यानुसार अस्तित्वात आला असून त्या कायद्याखाली दिलेल्या अधिकारानुसार मा. आयोगाने केलेले आदेश वि.प. यांचेवर बंधनकारक असतात. मा. आयोगाच्या निर्देशानुसार वि.प. यांनी जारी केलेली परिपत्रके अधिकारबाहय ठरु शकत

नाहीत. श्री सुनिल चव्हाण यांनी भारतीय राज्य घटनेतील काही तरतूदींचा उल्लेख केला तो कशासाठी याचा बोध होत नाही.

१३) या मंचाचे असे स्पष्ट मत आहे की, तक्रारदार विरुध्द सुरु केलेली कारवाई कलम १२६ च्या क्षेत्रात येत नाही. आणखी असे की, कलम १२६ खालील तरतूदीचे तसेच मा.आयोगाने केलेल्या नियमांचे पालनही, कथित कारवाई करताना , करण्यात आले नाही. याबाबत श्री खापरे यांनी सविस्तर युक्तिवाद केला आहे.

१४) ते काहीही असो, तक्रारदार यांनी आपल्या घराच्या मागिल बाजूच्या खोलीवजा शेडमध्ये टाकावू साहित्य ठेवून ते दिसण्यासाठी एक CFL बल्ब, घरातून वायर बसवून, वापरला या कारणा वरुन त्यांनी वीजेचा व्यापारी कारणासाठी अनधिकृत वापर केला असे म्हणता येणार नाही.

१५) वि.प. तर्फे श्री सुनिल चव्हाण यांनी युक्तिवादात असे निवेदन केले की, तक्रारदार श्री प्रकाश जाधव हे वीज ग्राहक नसून बाबूराव लक्ष्मण जाधव हे ग्राहक आहेत आणि प्रकाश जाधव यांच्या घर जागेतून बाबूराव यांच्या जागेमध्ये म्हणजे वादग्रस्त शेडमध्ये वीजेचा अनधिकृत वापर चालू होता. तथापि, हे निवेदन वि.प. यांना कोणतीही मदत करु शकत नाही. कै. बाबूराव चव्हाण हे तक्रारदार यांचे मयत वडील आहेत. ग्राहक क्र. २५०६४४००९७४९ ही घरगुती वीज जोडणी वाबूराव लक्ष्मण जाधव यांच्या नावे नोंद आहे. बाबूराव यांच्या पश्चात तक्रारदार श्री प्रकाश यांचा घर व शेडवरील मालकी हक्क सकृतदर्शनी मान्य करावा लागेल. बाबूराव यांच्या नावे असलेली घरगुती वीज जोडणी तक्रारदार प्रकाश हेच वापरीत आहेत. त्यामुळे वि.प. यांच्या वरील निवेदनात काहीही तथ्य नाही.

१६) या प्रकरणात, वि.प. यांनी तक्रारदार विरुध्द केलेली कारवाई कलम १२६ च्या कार्यकक्षेत येते काय हा मुख्य प्रश्न आहे आणि त्यास आमचे उत्तर नकारार्थी आहे. जर सदरची कारवाई कलम १२६ च्या कक्षेत आली असती तरच कलम १२६ खाली निर्देशित केलेली कार्यपध्दती आणि मा. आयोगाने केलेल्या विनियमांची योग्यरित्या बजावणी झाली किंवा नाही याचा विचार करावा लागला असता. या ठिकाणी कायद्याचे व नियमांचे योग्यरित्या पालन कारवाई करताना झाले की नाही याचा सविस्तर विचार करण्याची गरज नाही.

१७) वर सविस्तर नमूद केलेल्या कारणांस्तव या मंचाचे असे निष्कर्ष झाले आहेत की, वि.प. यांनी तक्रारदार यांचे विरुध्द चालू केलेली कारवाई विद्युत कायदा कलम १२६ च्या कक्षेत येत नाही. सर्व कारवाई अयोग्य व अवैधरित्या अंमलात आणलेचे दिसून येत आहे. त्यामुळे वि.प. यांनी तक्रारदार यांचेकडून वसूल केलेली रक्कम सव्याज परत मिळणेस तक्रारदार पात्र आहेत.सबब खालील प्रमाणे अंतिम आदेश करणेत येतो.

**आदेश**

१) तक्रारदार श्री प्रकाश बाबूराव जाधव यांचे विरुध्द , विरुध्द पक्षकार - वितरण कंपनी यांनी केलेली विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ खालील तथाकथित कारवाई अवैध व अयोग्य असल्याने त्या कारवाईमध्ये तक्रारदार यांचेकडून वसूल केलेली रक्कम रु. ४५,४८०/- विद्युत कायदा २००३ च कलम ६२ (६) प्रमाणे होणा-या व्याजासह वि.प. यांनी तक्रारदार यांना दोन महिन्यात परत द्यावी.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |